# शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली

कंत्राटी पध्दतीने सेवा पुरविण्याकरिता

## निविदा (दुसरी वेळ)

सुरक्षा रक्षक ०६ (पुरुष) ,शिपाई/हमाल ०३,माळी ०१ ,सफाईगार ०१ यांच्या सेवा कंत्राटी पध्दतीने दि.०१/११/२०२० पासून जास्तीत-जास्त ११ महिण्याकरिता घेण्यासाठी व्यवसाय नोंदणी असलेल्या कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे, निविदा दिनांक १९ /१०/२०२० रोजी सांय ५.३० वाजता पर्यत कार्यालयीन वेळेत स्विकारल्या जातील.यानंतर आलेल्या निविदांचा विचार केल्या जाणार नाही. सदरहु निविदा आपल्या प्रतिनिधीच्या समक्ष दिनांक २३/१०/२०२० ला दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येईल.

१.सुरक्षा रक्षक ,शिपाई/हमाल ,माळी ,सफाईगार यांचे दर स्वतंत्र द्यावे

२.अटी व शर्ती संस्थेच्या नोटीस बोर्डवर.व संस्थेची Web Site- www.gpgadchiroli.ac.in येथे पाहावे

Sd

डॉ. अतुल बोराडे

प्राचार्य,

शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली

महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन,गडचिरोली जि.गडचिरोली**

**एम.आय.डी.सी.रोड गडचिरोली**

फोन नं. ०७१३२—२२२६८७ फॅक्स ०७१३२—२२२२६०,

वेबसाईट : www.gpgadchiroli.ac.in ई.मेल : office.gpgadchiroli@dtemaharashtra.gov.in

क्र.शातंनिग/आस्था—२/कंत्राटी सेवा निविदा/२०२०/ 3160

दिनांक : 07/10/20

**विषय : सुरक्षा रक्षक/शिपाई,हमाल/माळी/सफाईगार पदे कंत्राटी तत्वावर भरणेबाबतची निविदा आणि अटी व शर्ती.**

संदर्भ : महसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर यांचे पत्र क्र.तंशिसं/विकाना/आस्था/का—३/ २०२०/१५४१,दिनांक १४ ऑगस्ट २०२०

महसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर यांचचं अधिनस्त शासकीय तंत्रनिकेतन गडचिरोली येथे दि.०१/११/२०२० ते 30/०९/२०२1 (११ महिने) या कालावधी साठी कंत्राटी स्वरूपात (सुरक्षारक्षक, शिपाई, हमाल,माळी,सफाईगार ) पुरविण्याकरीता दिनांक ०८/१०/२०२० ते १९/१०/२०२० या तारखेपर्यंत प्रत्यक्ष निविदा सायंकाळी ५.३० वाजता पर्यंत किंवा तत्पुर्वी पोहचतील बेताने सादर कराव्यात. दिलेल्या तारखे आणि वेळेनंतर निविदा स्विकारल्या जाणार नाही. निविदा दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

## निविदेसोबत जोडावयाची कागदपत्रे

१) शॉप आणि आस्थापना ( Establishment) कायदयाखाली नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र.

२) पोलीस अनुज्ञप्ती प्रमाणपत्र.

३) संस्थेचे पॅन कार्ड.

४) मागील तीन वर्षाचे Income Tax भरलेले प्रमाणपत्र (२०१७—१८, २०१८—१९, २०१९—२०)

५) GST प्रमाणपत्र.

६) केंद्रिय सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र.

७) कामगार कल्याण निधी नोंदणी प्रमाणपत्र.

८) E.P.F. कायद्याअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.

९) केंद्रिय एम.एस.एम.ई. नोंदणी प्रमाणपत्र

१०) जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी मागिल तिन महिण्यात निर्गमित केलेले संस्थेचे आणि स्वत:च्या नावाचे Police Clearence Certificate सादर करावेत.

११) ISO नोंदणी प्रमाणपत्र (IAS accrediated) आणि पडताळणी करण्यासाठी त्यात E-mail अंकित असावा सोबत ISO मध्ये Supply Private and Government Sector लिहिले असावे. अशा कंत्राटदारांना प्राधान्य देण्यात येईल.

१२) माजी सैनिक पुरविठार असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

१३) एखाद्या सुरक्षा रक्षकाचे काही कारणास्तव ऑन डयुटी नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना लाभ मिळावा यासाठी आयुर्विमा काढलेला असावा. असे चालु वर्ष धरून मागील ५ वर्षाचे आयुर्विमा काढल्याच्या प्रती सोबत जोडाव्यात. कोणत्या कंपनीचे वर्ष मो. नं. इत्यादी नमुद करावा.

१४) सदरची मनुष्यबळ पुरविणारी संस्था शासनाच्या कोणत्याही काळया यादीत नसल्याचे संस्थाचालकाचे प्रमाणपत्र.

निवदा संकेत स्थळावर दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन गडचिरोली यांचे कार्यालयाता निविदा समिती समक्ष व निविदा धारक प्रतिनिधी यांचे उपस्थितीत उघडण्यात येतील. निविदा धारक किंवा त्याचे उपस्थित नसल्यास सुध्दा निविदा उघण्यात येतील. या बाबत निविदा धारकास कोणतीही तक्रार करता येणार नाही. निविदा उघडण्याची तारीख व वेळ यामध्ये काही प्रशासकीय अडचणी आल्यास निविदा उघडण्याच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास कार्यालयीन सुचना फलकावर लाण्यात येईल.

निविदा अर्ज प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,गडचिरोली यांचे कार्यालयात कामाच्या दिवशी दिनांक ०८/१०/२०२० ते १९/१०/२०२० या कालावधीत ५.०० वाजता पर्यंत सादर करावे.

**निविदा उघण्याचा दिनांक २३/१०/२०२० ला दुपारी १२.०० वाजता उघण्यात येईल.**

(डॉ. [illegible])